सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १३/१२/२०२४

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण ११२४/प्र.क्र.१२९/पोल-१५, दिनांक १२ डिसेंबर- २०२४.

**विषय** :- महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अतंर्गत विहीत कालमर्यादेत करावयाच्या कार्यवाहीबाबत

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण ११२४/प्र.क्र.१२९/पोल-१५, दिनांक दिनांक १२ डिसेंबर- २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१२१२११२६००१२२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / आर्थिक गुन्हे ), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
सह पोलीस आयुक्त(आर्थिक गुन्हे शाखा), बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय,मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक ( कायदा व सुव्यवस्था,) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी का .क्र.२२

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "वित्त व लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अंतर्गत विहीत कालमर्यादेत करावयाच्या कार्यवाहीबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण ११२४/प्र.क्र.१२९/पोल-१५**
दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: १२ डिसेंबर,२०२४

**वाचा:**

१.गृह विभाग, शासन परिपत्रक क्र.एमपीआय १११९/प्र.क्र.०९/पोल-११, दिनांक २५.०२.२०१९

२. गृह विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ११२४/प्र.क्र.१२९/पोल-१५, दिनांक ०२.१२.२०२४

**परिपत्रक**

ठेवीदारांची फसवणूक केल्याप्रकरणी, महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात येतो. सदर दाखल गुन्ह्यांमध्ये बाधीत झालेल्या बळीतांना, उक्त कायद्यातील तरतूदीनुसार, त्यांच्या ठेवी परत करण्याच्या दृष्टिने करावयाच्या कालबध्द कार्यवाहीबाबत सुसुत्रता आणण्याच्या अनुषंगाने सविस्तर सूचना संदर्भाधीन दिनांक २५.०२.२०१९ च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. त्यानुसार मालमत्ता जप्तीबाबत राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर कायद्यातील कलम ५(३) प्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याने विशेषीत न्यायालयामध्ये ३० दिवसांत अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. तथापि, बहुतांश प्रकरणी सदर सूचनांनुसार कालबद्ध कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. दरम्यानच्या काळात जप्त करावयाच्या सदर मालमत्तांच्या परस्पर विक्रीमुळे त्यावर त्रयस्थ हितसंबंध (थर्ड पार्टी इंटरेस्ट) तयार होतात व प्रकरणे जास्त गुंतागुंतीची होतात. तसेच सदरची कार्यवाही विहीत मुदतीत न झाल्याने संबंधित गुंतवणूकदारांना मानसिक त्रासास सामोरे जावे लागते तसेच यात त्यांचा पैसा व वेळ वाया जातो.

एमपीआयडी कायद्यान्वये विहीत मुदतीत कार्यवाही न झाल्याने गुंतवणूकदार मा.उच्च न्यायालयामध्ये अर्ज सादर करतात. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे बहुतांश प्रकरणी सक्षम प्राधिकारी संबंधित न्यायालयांमध्ये केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती सादर करु शकत नाहीत किंवा सक्षम प्राधिकारी कार्यालयाकडील जे प्रतिनिधी न्यायालयीन सुनावणीसाठी उपस्थित असतात त्यांना त्या न्यायालयीन प्रकरणाबाबत पूरेशी माहिती उपलब्ध नसते. तसेच मा.उच्च न्यायालयामधील सरकारी वकीलही त्या प्रकरणासंदर्भात आवश्यक ती माहिती देवू शकत नाहीत.

सरकारी वकीलांकडून अशा प्रकरणांबाबत सक्षम प्राधिकारी व शासनासोबत समन्वय साधला जात नाही. अपु-या माहितीमुळे राज्य शासनाची बाजू मांडण्यामध्येही अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी केलेल्या कार्यवाहीबाबतची वस्तुस्थिती मा.उच्च न्यायालयास परिपूर्णपणे अवगत न झाल्याने काही प्रकरणांमध्ये मा. उच्च न्यायालयामार्फत गृह विभागातील वरिष्ठ अधिका-यांना मा. न्यायालयात हजर होण्यासाठी सूचना देण्यात आल्या. या संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल एका प्रकरणी तर मा. न्यायालयाने तीव्र नापसंती दर्शविली असून संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडून गुंतवणूकदारांना नुकसान भरपाई देण्यासाठी त्यांच्यावर जबर आर्थिक दंड लादण्याची बाबही मा.न्यायालयाच्या विचाराधीन होती.

तसेच प्रस्तूत प्रकरणांसंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्याची बाब मा. न्यायालयाने अधोरेखीत केली, सदरची गंभीर बाब विचारात घेवून मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यामुळे उपरोक्त संदर्भाधीन क्र. २ येथील <u>दिनांक ०२.१२.२०२४ च्या शासन परिपत्रकानुसार जिल्हाधिकारी यांना मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचना अधिक व्यापक स्वरुपात देण्याच्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भाधीन क्र. २ येथील दिनांक ०२.१२.२०२४ चे शासन परिपत्रक अधिक्रमित करण्यात येत असून</u> आता महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये जिल्हाधिकारी यांना करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे सूचना निर्गमीत करण्यात येत आहेत-

१. मालमत्ता जप्तीचे शासन आदेश राजपत्रात प्रसिद्ध झाल्यानंतर मालमत्ता अब्सल्यूट करण्याबाबत मा. विशेषीत न्यायालयामध्ये ३० दिवसांत अर्ज सादर करणे बंधनकारक आहे.शासनामार्फत मालमत्ता जप्तीचे आदेश शासनाच्या https://dgps.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतात. (संदर्भ क्र.१ शा.प. दि.२५.०२.२०१९)

२. महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ मधील तरतूदींनुसार मालमत्ता जप्तीबाबतचा आवश्यक प्रस्ताव पोलीस घटकांकडून प्राप्त झाल्यानंतर तो सक्षम प्राधिकाऱ्यांस तातडीने सादर करण्यात आला आहे किंवा कसे तसेच शासनाद्वारे जप्ती आदेश प्रसिद्ध झाल्यानंतर सक्षम प्राधिकारी यांच्यामार्फत मा. विशेषीत न्यायालयामध्ये ३० दिवसांत अर्ज सादर करण्यात आला आहे किंवा कसे याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी दरमहा आढावा घ्यावा. त्याचबरोबर प्रलंबीत प्रकरणांचाही आढावा घेऊन प्रकरणे मार्गी लावण्यासंदर्भातील कार्यवाही प्राधान्याने करावी.

   <u>आढाव्यादरम्यान संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष करण्यात आल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्याविरुद्ध जिल्हाधिकाऱ्यांनी शिस्तभंग विषयक कार्यवाही करावी.</u>

३. प्रस्तूत अधिनियमानुसार विविध न्यायालयांतील प्रलंबीत प्रकरणांमध्ये प्रकरणाचे गांभीर्य विचारात घेवून सक्षम प्राधिकारी यांनी मा.न्यायालयामधील न्यायप्रविष्ठ प्रकरणांचा तत्परतेने पाठपुरावा करावा. तसेच सक्षम प्राधिकारी यांनी मा.उच्च न्यायालयीन

प्रकरणांमध्ये संबंधित एमपीआयडी प्रकरणाची सर्व परिपूर्ण माहिती सरकारी वकीलांना द्यावी जेणेकरुन मा.उच्च न्यायालयामध्ये शासनाची बाजू मांडताना त्यांना अडचण येणार नाही. न्यायालयीन सुनावणी प्रक्रियेत आवश्यकतेनुसार व्यक्तिश: उपस्थित रहावे.

४. संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी मा.न्यायालयाने दिलेल्या सूचनांचे अनुपालन काटेकोरपणे करावे व आवश्यकतेनुसार प्रकरणांच्या वस्तुस्थितीबाबत शासनास अवगत करावे.

५. गुंतवणूकदारांचे हित विचारात घेता, संबंधित मालमत्तांच्या विक्रीनंतर मा.विशेषीत न्यायालयाच्या आदेशांनुसार देय रकमा अदा करण्याची कार्यवाही ही सक्षम प्राधिकारी यांनी प्राथम्याने करावी.

६. सक्षम प्राधिकारी यांनी मा. न्यायालय, तक्रारदार, तपासी अधिकारी व शासन यांच्याशी वेळोवेळी समन्वय साधावा.

७. संदर्भाधिन शासन परिपत्रक दि.२५.०२.२०१९ अन्वये देण्यात आलेल्या सूचनांनुसार जिल्हाधिकारी यांच्याकडून प्रस्ताव शासनास सादर करण्यात येतात. प्रस्तावातील काही कागदपत्रे / माहिती अपूर्ण असल्याने त्यांची पूर्तता करण्यामध्ये कालापव्यय होतो. सदर कालापव्यय टाळण्याच्या अनुषंगाने सदर शासन परिपत्रकासोबत पडताळणी सूची जोडण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांनी शासनास प्रस्ताव सादर करताना सदर सूचीतील कागदपत्रे काटेकोर तपासूनच शासनास परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा.

८. शासनाच्या उपरोक्त सूचनांच्या अनुषंगाने संबंधीतांना अवगत करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी त्यांचे अधिकृत संकेतस्थळ, ट्विटर व इतर संपर्क माध्यमांद्वारे सदर परिपत्रकास व्यापक प्रसिद्धी द्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२४१२१२११२६००१२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUGRIV SAMBHAJI DHAPATE

Digitally signed by SUGRIV SAMBHAJI DHAPATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FC102DE27DC1B41E747AC6CBB491C4209459C3CF340720EA98FD1D95B19C9F65, cn=SUGRIV SAMBHAJI DHAPATE
Date: 2024.12.12 11:27:10 +05'30'

**( डॉ.सुग्रिव धपाटे )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

३. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

५. अपर पोलीस महासंचालक (आर्थिक गुन्हे), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

६. सह पोलीस आयुक्त, (आर्थिक गुन्हे शाखा), बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय, मुंबई.

७. सर्व विभागीय आयुक्त, महसूल.

८. सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी.

९. सर्व पोलीस आयुक्त / सर्व पोलीस अधीक्षक.

१०. अधिक्षक, मा. उच्च न्यायालये/एमपीआयडी न्यायालये.

११. सर्व सक्षम प्राधिकारी (एमपीआयडी)

१२. निवडनस्ती, कार्यासन (पोल ११, १२, १३ व १५).

## <u>पडताळणी सूची</u>

## MPID प्रस्ताव शासनास सादर करताना जिल्हाधिकारी यांनी प्रस्तावासह द्यावयाची कागदपत्रे

| <u>अ.क्र.</u> | <u>कागदपत्राचा तपशिल</u> |
|---|---|
| १. | प्रस्तावासोबतच्या पत्रामध्ये वित्तीय संस्था, पो.स्टे., गु.क्र., कायदा व कलम, फसवणूक झालेल्या गुंतवणुकदारांची संख्या, फसवणुकीची रक्कम, प्रस्तावित स्थावर मालमत्ता आणि जंगम मालमत्ता यांची संख्या, मालमत्तेचे मुल्यांकन आणि प्रस्तावाच्या अनुषंगाने अभिप्राय नमूद करावेत. तसेच जिल्हाधिकारी यांनी प्रस्तावाच्या अनुषंगाने सक्षम प्राधिका-याची स्पष्ट शिफारस करावी. |
| २. | गृह विभाग,शासन परिपत्रक दि.२५.०२.२०१९ मधील परिशिष्ट-२ (मराठी व इंग्रजी) |
| ३. | FIR ची प्रत |
| ४. | वित्तीय संस्थेबाबतची कागदपत्रे |
| ५. | वित्तीय संस्था आणि संबंधित आरोपींच्या स्थावर मालमत्तेची कागदपत्रे (७/१२ उतारा किंवा मालमत्ता पत्रक, नोंदणीकृत खरेदीखत/ इतर दस्तावेज, इतर बोजे, मुल्यांकनपत्र) |
| ६. | वित्तीय संस्था आणि संबंधित आरोपींच्या बँक अकाउंट बाबतची कागदपत्रे |
| ७. | ठेवीदारांकडून प्राप्त तक्रारी / परतावा अर्ज |
| ८. | वित्तीय संस्था आणि संबंधित आरोपींच्या जंगम मालमत्तेची कागदपत्रे (असल्यास मुल्यांकनाचा तपशिल) |
| ९. | कलमवाढ केली असल्यास त्याबाबतची कागदपत्रे |
| १०. | फॉरेन्सिक ऑडीट करण्यात आले असल्यास त्याची प्रत |
| ११. | असल्यास दोषारोपपत्र |